


WWJMRD 2018; 4(6): 203-204
www.wwjmrd.com
*International Journal*
*Peer Reviewed Journal*
*Refereed Journal*
*Indexed Journal*
*Impact Factor MJIF: 4.25*
E-ISSN: 2454-6615

**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

# ''धर्माची आधारस्थाने''

## विश्वास गोरखनाथ वळवी

**Abstract**
Whatever be the religion, their religious values are the star for the society. To build a true society one must express the values of religion. The foundation of religion helps in the welfare of the society and the path of salvation. The foundation of a religion is based on the supreme personality of that religion and their ideology. Although the values and basis of each religion are different, each religion in the base places includes the first worshipers and scriptures. The essence of all religions is to make life simple and straightforward for the welfare and salvation of man. Even in modern times man has not left the basis of religion. He is associated with some religion. Man is also connected to nature by faith. Therefore, we can say that religion is an integral part of every human life. He presents his values to the society through his thoughts and actions. "Religion is the philosophy of the common people" 2 Schopenhaver's definition applies to the common man.

**Keywords:** Religion, Jesus Christ, Hinduism, Buddhism, Allah, Salvation, Teachings, Scriptures

## प्रस्तावना

धर्म कोणताही असो त्यांची धर्ममुल्ये हि समाजासाठी तारक असतात. एक सत्यमय समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी धर्माची धर्ममुल्ये प्रतिपादन करावीच लागतात. धर्माची आधारस्थाने हि समाजाच्या कल्याणार्थ आणि मोक्षाच्या मार्गावर चालण्यासाठी मदत करतात. धर्माची आधारस्थाने हि त्या धर्मातील सर्वोच्च व्यक्ती आणि त्यांच्या विचारावर आधारलेली असतात.

ख्रिस्ती धर्मात येशू ख्रिस्त आणि पवित्रशास्त्र हे दोन घटक धर्माच्या आधारस्थानी आहे. जरी येशू ख्रिस्ताने धर्म स्थापण्यास कोणतेही प्रयत्न केले नाही, तरी कालांतराने काही धर्मपुढाऱ्यांनी येशू ख्रिस्ताचा शिक्षणावर आणि पवित्रशास्त्राचा आधार घेवून त्याला धर्माचे स्वरूप प्राप्त करून दिले आणि त्यामुळे युरोपात धर्म आणि राज्यसत्ता यामध्ये मोठा संघर्ष घडून आला.

हिंदू धर्माच्या आधारस्थानांचा उगम वेद आहे. ऋग्वेद त्यात प्रथम आहे. वेद, उपनिषदे आणि गीता यांच्या शिक्षणावर आधारलेल्या हिंदू धर्मात भगवान राम आणि भगवान श्रीकृष्ण प्रथम पूजक व्यक्ती आहे. तसेच दशावतार, अनेकेश्वरवाद, पुनर्जन्म इत्यादी संकल्पना त्यात आहे. जन्म-मरणाचा चक्रासोबतच हिंदू धर्म एक संस्कृती, जीवनसृष्टी यावर आधारित एक जीवनपद्धती आहे.

बौद्ध धर्म विज्ञाननिष्ठ असून नास्तिक धर्म आहे. बुद्धीच्या कसोटीवर जे सत्य पाळले जाते त्यांचे निष्कर्षच बौद्ध धर्माचा गाभा आहे. अष्टांग मार्ग, बोधीसत्व, प्रतीसमुत्पात इत्यादी संकल्पना जीवन जगण्याचा आधार आहे. त्रिपिटक ग्रंथ बौद्ध धर्माच्या शिक्षणाची आणि आचरणाची नियमावली आहे.

जैन धर्म अहिंसेवर भर देत असून जैन धर्माचा आधार तीर्थंकर आणि साद्यवाद आहे. ज्ञान त्यांच्या मुळाशी आहे. अपरोस आणि परोस ज्ञान म्हणून ते ओळखले जाते.

पारशी धर्माच्या मुळाशी आहुर देवता असून अग्नी आणि अग्यार हे दोन घटक व्यक्तीचा आधार आहे.

मुस्लीम धर्म महमद पैगंबर आणि पवित्र कुराण यावर आधारलेला आहे. मुस्लीम धर्माची आधारस्थाने म्हणजे दिवसातून पाच वेळा नमाज पठन करणे, आयुष्यात एकदा तरी मक्केला भेट (हज) देणे, आपल्या संपत्तीतून अडीच टक्के गरिबांसाठी दान देणे. त्याचबरोबर "अल्लाह अ एक ईश्वर असून कोणीही त्यापेक्षा वरचढ नाही (ला इल्ह हिल्लल्लाह), मुहमद हे अल्लाह शेवटचे प्रेषित आहेत. (महम्मदे रसूल अल्लाह) इस्लाम हा शब्द अरबी भाषेतील असून मूळ शब्द अल्लम (अस+अलम) असा ज्याचा शब्दशः अर्थ भावार्थ परमेश्वरापुढे शरणागती पत्करणे व त्या परमेश्वराच्या सर्वशक्तिमान म्हणून पूजाने असा आहे."[१]

**Correspondence:**
**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

प्रत्येक धर्माची धर्ममुल्ये आणि आधारस्थाने इ वेगवेगळी असली तरी आधार स्थानांमध्ये प्रथम पूजक व्यक्ती आणि धर्मग्रंथ यांचा समावेश प्रत्येक धर्मात आढळतो. सर्व धर्माचा सार हा मनुष्याच्या कल्याणार्थ आणि मोक्षप्राप्तीसाठी जीवनमार्ग सोपे आणि सरळ करणे, हाच आहे. आधुनिक काळात देखील मनुष्याने धर्माचा आधार सोडलेला नाही. तो कोणत्या ना कोणत्या धर्माशी जुडलेला आहे. मनुष्य देखील निसर्गाशी श्रद्धेने जोडलेला आहे. त्यामुळे आपण म्हणू शकतो, धर्म प्रत्येक मनुष्याच्या जीवनाचा अविभाज्य घटक अथवा जीवनशैली आहे. तो आपल्या विचार आणि आचरणातून त्याची मुल्ये समाजापुढे मांडत असतो. "धर्म म्हणजे आम जनतेचे तत्वज्ञान"[२] शोपेन होवरची हि व्याख्या सामान्य मनुष्याला लागू होते. एका सामान्य माणसाचे साधे तत्वज्ञान धर्मात सामाविलेले असते. ते त्याला जगण्याचे बळ देत असते.

**संदर्भसूची:-**


1. www.vishwakosh.marathi.gov.in Date 15/11/2017, Time 11.13 AM
2. पाश्चिमात्य तत्वज्ञानाची कहाणी, साने गुरुजी वरदा प्रकाशन, प्रथमावृत्ती, पुणे, २०११, पृ.क्र. ३६३.